**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत विद्यापीठ संघाने पटकाविला तृतीय क्रमांक
## चमूचा कुलगुरुंचे हस्ते सत्कार

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कव्वाली चमूने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजने आयोजित केलेल्या तृतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला. कव्वाली चमूने अव्वल कामगिरी करुन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. याबद्दल कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी चमूतील सर्व स्पर्धकांचे अभिनंदन केले.

चमूमध्ये कु. अनुजा अपस्तंभ, कु. अंकिता इंगोले, कु. प्रमोदिनी आहुड, कु. शुभांगी पांडे, कु. वैष्णवी ठाकूर, कु. शताक्षी देशमुख, तेजस कडू, चेतन ठाकूर, नवलकुमार जाधव व आदित्य दुधाट, साथीदार म्हणून श्री प्रशांत ठाकरे, श्री रवि गिरी व अक्षय कांबळे यांचा, तर चमू व्यवस्थापक म्हणून लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. चंद्रशेखर कुडमेथे व मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मुर्तिजापुरच्या प्रा. प्रिती इंगळे यांचा समावेश होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चमूने उत्तम कामगिरी केली.

चमूतील सर्व स्पर्धकांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी अभिनंदन केले. यावेळी व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी उपस्थित होते.

---

प्रति,
**जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दि. २६/१०/२०१८.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी